## सहवेदना

### शांता गोटखिंडे



**मिरज :** सांगलीवाडीतील विजय कॉलनी येथे राहणाऱ्या शांता नामदेव गोटखिंडे (वय ७३) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुली, मुलगा, जावई व नातवंडे असा परिवार आहे. नामदेव गोटखिंडे यांच्या त्या पत्नी होत. रक्षाविसर्जन बुधवारी सकाळी नऊ वाजता होणार आहे. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# महावितरण कर्मचाऱ्याच्या मृत्यूची चौकशी करा

## वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरणार-इंद्रजित घाटे

प्रतिनिधी
मिरज

सोनी येथे अक्षय साखरे (वय २७, रा. सिध्देवाडी) या महावितरणच्या वायरमनचा काम सुरू असताना शॉक लागून जागीच मृत्यू झाला होता. या घटनेची चौकशी करुन साखरे कुटुंबियांना योग्य न्याय द्यावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे युवानेते इंद्रजित घाटे यांनी केली.

याकडे दुर्लक्ष झाल्यास रस्त्यावर उतरुन न्याय मिळवून देण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. २० एप्रिल रोजी सोनी-उपळावी मार्गावर महावितरणच्या ट्रान्स्फॉर्मरचे काम करताना विजेचा धक्का लागून अक्षय साखरेचा जागीच मृत्यू झाला. यामुळे साखरे कुटुंबियांवर आघात झाला आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या महावीर कांबळे, नजीर झारी, युनूस चाबुकस्वार, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र पाटील, बाळासाहेब पाटील या पदाधिकाऱ्यांनी इंद्रजित घाटे यांच्या नेतृत्वाखाली साखरे कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी साखरे कुटुंबियांचे सात्वन करताना या कुटुंबाचा अक्षय हा एकुलता एक मुलगा गेल्याने त्यांच्या कुटुंबावर आघात झाला आहे. त्यामुळे मदतीचे आवाहन करण्यात आले. महावितरण आणि प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन साखरेंच्या कुटुंबियांना भरीव मदत करावी, तसे न झाल्यास वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून रस्त्यावर उतरुन साखरे कुटुंबियांना न्याय देऊ, असा इशारा इंद्रजित घाटे यांनी दिला.



**मिरज : मयत कर्मचाऱ्याच्या नातेवाईकांची विचारपूस करताना इंद्रजित घाटे, महावीर कांबळे व अन्य.**

घटना घडून पाच दिवस झाले तरी संबंधीत विभागाने आणि प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला. या कुटुंबाला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासनही घाटे यांनी यावेळी दिले.

# चारचाकीला हात लावल्याने विद्यार्थ्याला बेदम मारहाण

## मिरजेतील घटना, गांधी चौकी पोलिसात तक्रार

प्रतिनिधी
मिरज

शहरातील बेथेस्दा स्कूलजवळ रस्त्याकडेला लावलेल्या चारचाकीला हात लावल्याने विद्यार्थ्याला शिवीगाळ करुन बेदम मारहाण करण्यात आली. सोमवारी दुपारच्या सुमारास हा प्रकार घडला.

याप्रकरणी संबंधीत विद्यार्थ्याच्या पालकांनी महात्मा गांधी चौकी पोलिसात तक्रार दिली असून, संशयीत कार मालक परेश पाटणकर यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. संबंधीत विद्यार्थी हा बेथेस्दा स्कुल येथे दहावीत शिकत आहे. सोमवारी जादा तास असल्याने तो दुपारपर्यंत शाळेत होता. शाळा सुटल्यानंतर तो मित्रासोबत घरी जात होता. शाळेच्या पाठीजवळ असलेल्या कपिला कॉलनी येथे रस्त्याकडेला चारचाकी थांबली होती. संबंधीत विद्यार्थ्यांनी चालत जाता-जाता चारचाकीला हात लावला. त्यामुळे कार मालक रमेश पाटणकर यांना राग आला. पाटणकर यांनी संबंधीत विद्यार्थ्याला पकडून शिवीगाळ करत बेदम मारहाण केली.

# अन्न-औषध मंत्रालयातील भ्रष्टाचार थांबवा

## केमिस्ट असोसिएशनचे आमदार अनिल बाबर यांना निवेदन : अध्यक्ष विजय पाटील यांची माहिती

प्रतिनिधी
विटा

राज्यातील औषध विक्रेते अन्न आणि औषध प्रशासन मंत्र्यांच्या कार्यालयातील भ्रष्टाचाराने त्रस्त झाले आहेत. तरी अन्न आणि औषध प्रशासनाच्या भ्रष्ट कारभाराविषयी चौकशी करावी, अशी मागणी खानापूर तालुका केमिस्ट असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबतचे निवेदन आमदार अनिल बाबर यांना देण्यात आल्याचे राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष विजय पाटील यांनी सांगितले. यावेळी केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष भरत सावंत, जिल्हा सहसचिव प्रकाश सुर्यवंशी, निमंत्रित संचालक अनिल देशमुखे, तालुकाध्यक्ष फैय्याज शेख यांच्यासह सभासद उपस्थित होते.



**विटा : आमदार अनिल बाबर यांना निवेदन देताना विजय पाटील, भरत सावंत यांच्यासह पदाधिकारी.**

यावेळी आमदार बाबर यांनी योग्य तो मार्ग काढण्याचे आश्वासन दिल्याचे राज्याध्यक्ष पाटील यांनी सांगितले. याबाबत महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे, राज्यातील औषध विक्रेत्यांच्या तपासण्या अन्न आणि औषध प्रशासनाद्वारे कायद्यानुसार नियमित केल्या जातात.औषध दुकानदारांकडून कायद्याचे पालन करताना अनावधानाने होणाऱ्या छोट्या-मोठ्या त्रुटींकरता प्रशासनाद्वारे त्यांच्या औषध विक्रीचे परवाने काही काळासाठी निलंबित करणे अथवा कायमस्वरूपी रद्द करणे, अशा प्रकारची कारवाई केली जाते.

अन्न आणि औषध प्रशासनाकडून अनेकवेळा छोट्या-मोठ्या त्रुटींसाठी औषध विक्रेत्यांना अवाजवी शिक्षा केली जाते. औषधी आणि सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईविरोधात मंत्र्यांकडे अपील करण्याची तरतूद कायद्यात असल्यामुळे औषध विक्रेते अपील दाखल करतात. अपिलावर स्थगन आदेश देणे अथवा सुनावणी लावून निर्णय देणे अपेक्षित असते, असे निवेदनात म्हंटले आहे.

अनेकवेळा शिक्षेचा कार्यकाळ संपून गेला तरीही मंत्र्यांकडे कार्यालयाकडून निर्णय दिला जात नाही. यामुळे अनेक सभासदांना नाहक शिक्षा भोगावी लागते. प्रत्यक्षात औषध विक्रेत्यांना मंत्र्यांच्या पीएकडून पैशाची मागणी केली जात आहे. याबाबत संघटनेने यापूर्वीही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, स्वत: मंत्री यांना पत्राद्वारे आणि प्रत्यक्ष भेटून सुचित केल्यानंतरही भ्रष्टाचार कमी होण्याऐवजी वाढलेला असल्याच्या तक्रारी संघटनेकडे तोंडी स्वरूपात होत आहेत. यामुळे औषध विक्रेत्यांमध्ये सरकारच्या विरोधात रोष निर्माण होत आहे. याबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे, अन्यथा संघटनेला आंदोलन करावे लागेल, असा इशारा निवेदनात केला आहे.

यावेळी तालुका सचिव अमित कोळी, उपाध्यक्ष आशिष घाडगे, अमोल मुळीक, शहराध्यक्ष सिद्धार्थ मुळीक, सचिव तुषार पवार, यांच्यासह सदस्य उपस्थित होते.

# बावचीत घरजागेच्या वादातून दोन गटात जोरदार हाणामारी

## दोन्ही बाजूचे मिळून सहा जखमी : आठजणांवर गुन्हा नोंद

वार्ताहर
आष्टा

वाळवा तालुक्यातील बावची येथे घराच्या जागेच्या वादातून दोन कुटुंबात जोरदार हाणामारी झाली. या हाणामारीत दोन्ही बाजूचे मिळून सहा जण जखमी झाले. याप्रकरणी दोन्ही गटांनी परस्पराविरोधी फिर्यादी दिल्या असून आष्टा पोलिसांनी आठ जणांवर गुन्हा नोंद केला आहे. रविवार दिनांक २३ एप्रिल रोजी दुपारी पावणेदोनच्या सुमारास घटना घडली.

तानाजी शंकर खोत यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, जुन्या घराची कौले काढून नवीन पत्रा बसवित असताना संजय खोत, अनिकेत खोत, प्रकाश खोत, सुरेखा खोत यांनी फिर्यादीस पत्रे कापून कुठे घालतोस? तुझा काय संबंध? तुझा काय संबंध घर आमचे आहे. असे म्हणून चाकू, लोखंडी गज आणि लाकडी पट्टीने मारहाण करून तानाजी शंकर खोत, त्यांचे वडील शंकर गुंडा खोत, मुलगा राज तानाजी खोत सर्व राहणार बावची, मेव्हणा अमोल आनंदा घाडगे टोप, कासारवाडी यांना जखमी केले.

अनिकेत संजय खोत यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, घराच्या पाठीमागील बाजूस तानाजी शंकर खोत हे घर दुरुस्तीचे काम करत होते. यावेळी अनिकेत यांचे आई वडील वकिलांनी दिलेले नोटीस दाखवण्यास गेले असता शंकर गुंडा खोत, राज तानाजी खोत व अमोल आनंदा घाडगे यांनी अनिकेत खोत यांच्या आई वडिलांना शिवीगाळ आणि धक्काबुक्की केली.

त्या ठिकाणी अनिकेत खोत आणि त्यांचा भाऊ प्रकाश खोत हे गेले असता तानाजी खोत यांनी अनिकेत खोत यांच्या डाव्या हाताच्या पोटरीवर तर अमोल घाडगे याने लोखंडी पाईप डोक्यात मारून जखमी केले. तसेच राज खोत याने लाकडी दांडक्याने प्रकाश खोत यांच्या पाठीवर मारले. तसेच अमोल घाडगे यांनी लोखंडी पाईप डोक्याच्या पाठीमागील बाजूस मारुन जखमी केले.

या घटनेची नोंद आष्टा पोलीस ठाण्यात झाली असून पोलीस निरीक्षक अजित सिद यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टा पोलीस अधिक तपास करीत आहे.

# करमाळा येथे आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यावरून दोन गटात मारामारी, परस्पर विरोधी फिर्यादी

वार्ताहर
शिराळा

करमाळे ( ता.शिराळा ) येथे सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यावरून विळा व पारळीने झालेल्या मारामारीमध्ये सुवर्णा तुकाराम पाटील व सुप्रिया सचिन पाटील या दोन्ही फिर्यादी जखमी झाल्या आहेत. याबाबत शिराळा पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या आहेत. तर यामध्ये दोन्ही बाजूंच्या नऊ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत शिराळा पोलिस ठाण्यातून मिळालेली माहिती अशी की, घटना सोमवार दि. २४ रोजी सायंकाळी साडेसात वाजता घडली. सुवर्णा तुकाराम पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, तुझ्या मुलाने माझे मुलाबद्दल मोबाईलवर वाईट पोस्ट का टाकली असे विचारण्यासाठी सचिन तानाजी पाटील, तानाजी रामचंद्र पाटील, सुप्रिया सचिन पाटील हे आले असता धक्काबुक्की, मारहाण व वादावादीत सचिन पाटीलने पारळीने वार केल्याने सुवर्णा पाटील या जखमी झाल्या. तर फिर्यादिचे पती तुकाराम व मुले सुरज व स्वप्निल यांनाही मारहाण करण्यात आली. सुवर्णा यांच्या जाऊ मनिषा हिस धक्काबुक्की केलेवर त्यांचे गळयातील दागिना कोठेतरी पडला.

तर सुप्रिया सचिन पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये तुकाराम ज्ञानु पाटील, सुरज तुकाराम पाटील, स्वप्निल तुकाराम पाटील, मनीषा शिवाजी पाटील, सुवर्णा तुकाराम पाटील, नानासो ज्ञानु पाटील हे फिर्यादिचे पती सचिन तानाजी पाटील यांचे विरुदध चुकीची वाईट पोस्ट का टाकली याबाबत फिर्यादीचे सासरे तानाजी रामचंद्र पाटील यांना विचारणा केली असता झालेल्या धक्काबुक्की,मारहाण व वादावादीत स्वप्निल पाटीलने विळयाने केलेल्या मारहाणीत सुप्रिया पाटील या जखमी झाल्या तसेच त्यांच्या गळयातील दागिना भांडणात कोठेतरी पडलेला आहे. तर फिर्यादीचे पती सचिन पाटील यांनाही मारहाण करण्यात आली आहे. अशी फिर्याद दिली आहे. दोन्हीकडील सचीन पाटील, तानाजी पाटील, सुप्रीया पाटील तुकाराम पाटील, सुरज पाटील, स्वप्निल पाटील, मनीषा पाटील, सुवर्णा पाटील, नानासो पाटील या नऊ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# रिक्षा, दुचाकी अपघात : चौघे जखमी

## रस्त्याच्याकडेला दुभाजक नसल्याने अपघात

प्रतिनिधी
मिरज

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रस्त्यावर दुचाकी आणि रिक्षाचा अपघात झाला. या अपघातात महिलेसह चौघेजण जखमी झाले. रस्त्याकडेला दुभाजक नसल्याने अपघात झाला आहे.

सदर अपघाताची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. अपघाताबाबत गांधी चौकी पोलिसात नोंद असून, उशिरा गुन्हा दाखल झाला नसल्याने जखमींची नांवे समजू शकली नाहीत.

शहरात छत्रपती शिवाजी रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. ठेकेदाराने रस्त्याचे काम अर्धवट सोडून दिल्याने वारंवार अपघातांच्या घटना घडत आहेत. त्यात रस्त्याकडेला संरक्षित कठडे अथवा दुभाजक नसल्याने खड्ड्यांमध्ये वाहने अडकून अपघातांच्या घटना घडत आहेत.

रिक्षा चालकही बेफिकिरपणे या रस्त्यावरुन रिक्षा वाहतूक करताना दिसत असल्याने वाहनधारकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. मंगळवारी एक महिला छत्रपती शिवाजी रस्त्यावरुन दुचाकीवरुन चालली होती. याचवेळी समोरुन एक रिक्षा भरधाव वेगात आली. रिक्षामध्ये दोघे प्रवाशीही होते.

भरधाव रिक्षा चालकाना रस्त्याकडेच्या दुभाजकाचा अंदाज न आल्याने मोटारसायकलीला धडक बसली. अपघातात मोटारसायकल स्वार महिलेसह रिक्षातील दोघे प्रवासीही जखमी झाले. अपघातातील संबंधीत जखमींनी मिरज ग्रामीण पोलिसात तक्रार दिली. सदरचा अपघात सीसीटीव्हीत कैद झाला असून, पोलिस पंचनामा सुरू आहे. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला.

# कुणीकोनूर दुहेरी हत्त्याकांड प्रकरणी तीन दिवस पोलीस कोठडी

प्रतिनिधी
जत

कुणीकोनूर येथे पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत मायलेकीचा गळा आवळून खून केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी संशयित आरोपी बिरुदेव उर्फ बिराप्पा नाना बेळुंखे यास सोमवारी अटक केली होती.

मंगळवारी पोलिसांनी न्यायालयासमोर उभे केले असता आरोपीस २७ एप्रिलपर्यंत तीन दिवसाची पोलीस कोठडी दिली.

स्वत:च्या पत्नीचा व मुलीचा खून कसा केला. याकरिता पूर्वनियोजित तयारी कट होता का? नेमके कारण काय? यात आणखी कोणी सामील आहेत का? यासंबंधीचा उलगडा झाला नाही याचा तपास सपोनि पंकज पवार करत आहे.

कुणीकोनूर येथील बेळुंखे वस्तीवर एका झोपडीत प्रियांका बिराप्पा बेळुंखे (वय ३२) व मोहिनी बिराप्पा बेळुंखे (वय १४) या दोन्ही मायलेकीचा मृतदेह आढळून आला होता. शेजारीच दोरी व ओढणी सापडली होती. ही घटना रविवारी रात्री उघडकीस आली होती. या दुहेरी हत्याकांडामुळे तालुका पुन्हा हदरला आहे. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे यांनी भेट देत कसून तपास करण्याचा सूचना सपोनि पंकज पवार यांना दिल्या आहेत.

# गार्डी येथे चारचाकीच्या धडकेत महिला गंभीर जखमी

**विटा :** चारचाकीने मागून धडक दिल्याने अर्चना हणमंत कु-हाडे ( वय २१, गार्डी, ता. खानापूर ) ही विवाहिता जखमी झाली. हा अपघात सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास गार्डी येथे विटा-मायणी रस्त्यावर झाला. याबाबत भरत तिमाप्पा कु-हाडे (गार्डी) यांनी विटा पोलिसात फिर्याद दिली. याप्रकरणी चारचाकी चालक दिलीप कुंडलीक मोहिते ( मांजर्डे, ता. तासगाव ) याच्यावर गुन्हा दाखल केल्याचे पोलिसांनी सांगितले.

याबाबत पोलिसातून मिळालेली माहिती अशी, मोहिते याने त्याचे ताब्यातील इनोव्हा गाडी (एम. एच. १०. बी. एम. ५५ ) भरधाव वेगाने चालवून अर्चना कु-हाडे हिस जोराची धडक दिली. त्यात ती गंभीर जखमी झाली. अपघातानंतर अपघाताची माहिती न देता व तिला औषध उपचारासाठी मदत न करता पळून गेला, असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास हवालदार विक्रम गायकवाड करत आहेत.

# बामणोलीत दुकानातून सोन्याची चेन पळवली

वार्ताहर
कुपवाड

बामणोली येथील एका किराणा दुकानातून ग्राहकाने सोन्याची चेन पळविल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दत्तात्रय पुंडलिक पेटकर यांच्या किराणा दुकानात ग्राहक बनून आलेल्या दोघा अज्ञातांनी दुकानातील काऊंटरमध्ये ठेवलेली १९ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन लंपास केली आहे.

याबाबत कुपवाड पोलिसात नोंद झाली असून पोलिसांनी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी दत्तात्रय पेटकर यांचे बामणोली येथे किराणा दुकान आहे. मंगळवारी १८ एप्रिल रोजी दुकान सुरु होते. रात्री दोघे अज्ञात तरुण ग्राहक बनून बाजार घेण्याच्या उद्देशाने दुकानात आले. यावेळी दुकानदार पेटकर इतर ग्राहकांना बाजार देण्यात व्यस्त होते. यावेळी अज्ञातांनी पेटकर यांची नजर चुकवून काऊंटरमध्ये ठेवलेली १९ हजारची सोन्याची चेनची चोरी केली.

याबाबत पेटकर यांनी सोमवारी रात्री कुपवाड पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला.

# अतिक्रमण काढण्यावरून नागेवाडीत राडा

प्रतिनिधी
विटा

नागेवाडी येथे गायरान जमिनीवरील अतिक्रमण काढण्यावरून सरपंच, ग्रामसेवक आणि अतिक्रमित जागेवरील ग्रामस्थ यांच्यात जोरदार धुमश्चक्री झाली. यात सरपंचांसह अन्य दोघे जखमी झाले. ही घटना मंगळवारी सकाळी साडेअकराच्या दरम्यान घडली. याप्रकरणी परस्परविरोधी फिर्यादी दाखल झाल्या असून एकूण १८ जणांवर विटा पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली

पोलिसातून मिळालेली माहिती अशी, नागेवाडी येथे ग्रामपंचायत गायरान जागेत मंडले कुटुंबीयांची शेड वजा घरे आहेत. ही घरे अतिक्रमणामध्ये आहेत, त्यावरून यापूर्वीही वाद झाला होता. ही शेड काढण्यासाठी मंगळवारी सकाळी सरपंच सतीश निकम, ग्रामसेवक महादेव इंगवले यांच्यासह पथक गेले. यावेळी संगीता धोंडीराम मंडले, अनुसया दिलीप मंडले, किसाबाई नारायण मंडले, येसाबाई बयाजी मदने, संग्राम किसना माने, उदय संपत नलवडे, संतोष राजेंद्र माने, गणेश दिलीप मंडले, रुपेश धोंडीराम मंडले, संगीता मंडले यांच्या दोन सुना, दिलीप मंडले यांच्या दोन सुना ( रा.सर्व नागेवाडी) यांनी अंगावर चटणी टाकून, दगडं मारून पथकावर हल्ला केला. तर सरपंच सतिश निकम यास संतोष राजेंद्र माने यांनी दगड मारून जखमी केले, तर त्यांचे सोबत असलेल्या प्रशांत माने यास उदय नलवडे यांनी लाथ मारली, अशी फिर्याद नागेवाडीचे ग्रामसेवक महादेव संभाजी इंगवले यांनी विटा पोलिसात दाखल केली आहे. त्यावरून वरील सर्वांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सांगितले.

तर याच घटनेतील संशयित संगीता मंडले यांनी आपण ग्रामसेवकाला संबंधित कागदपत्रे दाखवत असताना सरपंच सतीश निकम यांनी शिवीगाळ करून विनयभंग करून काठीने मारहाण करून घरातून ढकलून दिले. तसेच अनुसया मंडले यांना सुद्धा प्रशांत माने आणि आप्पासो निकम यांनी शिवीगाळ करून यांची घरे काढा, असे ओरडून धमकी दिली. या लोकांमुळे आमच्या जिवितास धोका आहे, अशी फिर्याद दिली आहे.

त्यावरून विटा पोलिसांनी सरपंच सतिश निकम, प्रशांत माने आणि आप्पासो निकम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे, असे पोलिसांनी सांगितले. पोलीस निरीक्षक संतोष डोके अधिक तपास करीत आहेत.

# दुधोंडीतून दुचाकीची चोरी

**कुंडल :** दुधोंडी तालुका पलूस येथील अजित पांडुरंग गायकवाड यांची हिरो होंडाची दुचाकी क्रमांक एम.एच.१० बी. पी. ५०१८ अज्ञात चोरट्याने २१ एप्रिलच्या रात्री चोरून नेली असल्याची फिर्याद कुंडल पोलिसांत दिली आहे. अधिक तपास के. बी. हारुगडे करीत आहेत.

THE UGAR SUGAR WORKS LIMITED
Regd. Office : Mahaveernagar (Wakhar Bhag), SANGLI - 416416
CIN: L15421PN1939PLC006738

NOTICE

NOTICE is hereby given that, the meeting of the Board of Directors of the Company will be held on **Monday, the 08th May, 2023,** to approve and take on record Standalone & Consolidated Audited Financial Results and Segment-wise Revenue Results for the quarter & year ended, **31st March, 2023.**

Further in accordance with SEBI (Prohibition of Insider Trading) Regulations 2015, we have already annonced Prohibitions of Trading by Insiders, the Trading Window for dealing in the securities of the Company shall remain closed for the Directors, Designated Employees and Insiders from 1st April, 2023 to till 48 hour after the declaration of Financial Result (both days inclusive).

Sangli
26-04-2023

For The Ugar Sugar Works Ltd.
Sd/-
Tushar V Deshpande
Company Secretary

Nupur Ads

सिव्हील इंजिनिअर पाहिजेत

आमच्या संस्थेच्या इस्लामपूर शाखा इमारत बांधकामाकरिता इंजिनिअर नेमणे आहेत.
शैक्षणिक पात्रता - B.E. Civil / D.C.E.
दि. ०३/०५/२०२३ पर्यंत संस्थेत अर्ज करावेत

शिक्षण सेवक सहकारी सोसायटी लि. सांगली
प्लॉट नं. १०, द. शिवाजी नगर सांगली
मोबा. ७३५००१०१३१/३२

# कारच्या धडकेत महावितरणचे नुकसान

**मिरज :** मिरज-पंढरपूर रस्त्यावरील ग्रामीण पोलिस ठाण्याच्या बाजूस असलेल्या विद्युत खांबाला भरधाव बुलेरो चारचाकी धडकल्याने महावितरणचे सुमारे ५५ हजार रुपयांचे नुकसान झाले. याप्रकरणी रामदास गणपती घोडके (रा. बुधगाव) यांनी मिरज शहर पोलिसात तक्रार दिली. त्यानुसार संशयीत ओंकार इरळे (रा. कवठेमहांकाळ) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पंढरपूर रस्त्यावरील मिरज ग्रामीण पोलिस ठाण्यालगत महावितरणचे खांब आहे. ओंकार इरळे हा बुलेरो चारचाकी (एमएच-१०-सीएन-८४५६) घेऊन भरधाव वेगात रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करीत आला. सदर चारचाकीने विद्युत खांबाला जोराची धडक दिली. त्यामुळे खांब वाकून विद्युत ताराही तुटल्या. यामुळे महावितरणचे सुमारे ५५ हजार रुपयांचे नुकसान झाले. याबाबत शहर पोलिसात नोंद आहे.

# शिक्षक, शिक्षकेतरांचे १ मे पासून आंदोलन

प्रतिनिधी
सांगली

एक नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करावी, अशी मागणी राज्य जुनी पेन्शन समन्वय समितीने केली आहे. यासाठी राज्यभरातील २६ हजारहून अधिक कर्मचारी येत्या एक मे पासून मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन करणार असून, सरकारला ही मागणी मान्य करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंतची अंतिम मुदत दिली आहे.

येत्या काही दिवसांत मुख्यमंत्र्यांनाही भेटणार असल्याचे पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी बैठकीत सांगितले. यावेळी समाधान घाडगे, अर्जुन सावंत, अमोल कुलकर्णी, विवेक कुंडले, सातलिंग तवटे आदी उपस्थित होते.

सावंत म्हणाले, हे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सन २००५ पूर्वी नोकरीस लागले होते. त्यांना कायम नेमणुकाही मिळाल्या होत्या. पण ते काम करत असलेल्या शाळा १०० टक्के अनुदानित नव्हत्या. पूर्णत: अनुदानित होण्यास २००९ साल उजाडले. त्यामुळे हे सर्व कर्मचारी नव्या पेन्शन योजनेत गृहीत धरले गेले. सावंत यांनी सांगितले की, कर्मचारी नोकरीस लागले तेव्हा, शाळांना १०० टक्के अनुदान नसले, तरी शिक्षक मात्र कायम नियुक्तीत होते. त्यामुळे ते जुन्या पेन्शन योजनेसाठी पात्र आहेत. ती मिळवणे हक्क आहे. नियुक्तीपासून त्यांना वेतन आयोगानुसार वेतनही मिळाले आहे. फक्त पेन्शनमध्ये डावलले जात आहे. यातील अनेकजण जुन्या योजनेत समावेश होण्याची वाट पाहून सेवानिवृत्तही झाले आहेत, पण सरकारने निर्णय घेतलेला नाही.

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

मुख्य कार्यालय - कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली
फोन नं.- ०२३३ - २३२४६४१ ते ४५, Email-est@dccbsangli.com

जाहीर निविदा
सोने तारण कर्जासाठी प्लॅस्टीक बॅग पुरविणे बाबत

सोने तारण कर्जासाठी बँकेस ऑडिट सिल व टॉप सिल असलेल्या प्लॅस्टीक पिशव्यांची आवश्यकता असून त्याची माहिती पुढील प्रमाणे आहे.

Printed LD Natural TP tape Gold Loan bag 80 Micron or above 1 Top Seal + 2 Audit With tape on both size printing
1) 7" x 11" Plus 1" tear of Counter Qty.- 50,000
2) 5.6" x 8.5" Plus 1" tear of Counter Qty.- 75,000

विक्रेत्यांनी वेबसाईटवर दिलेला तपशिल, अटी व शर्ती विचारात घेवून आपले सिलबंद कोटेशन दि. ०२/०५/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालयाकडील, ईएसटी विभागाकडे जमा करणेचे आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष

## निवडणूक जाहीर प्रकटन

### कृषी उत्पन्न बाजार समिती आटपाडी

### पंचवार्षीक निवडणूक सन २०२३ ते २०२८

या जाहीर प्रकटनाद्वारे आटपाडी कृषी उत्पन्न बाजार समिती आटपाडी यांचा पंचवार्षीक निवडणूक सन २०२३ ते २०२८ हा राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण म.रा. पूणे यांनी त्यांचेकडिल दिनांक २०/३/२०२३ च्या आदेशाने निवडणूक कार्यक्रम मंजुर केला आहे. सदर मंजुर कार्यक्रमातील कॉलम . ९, १० व ११ या बाबत मी निवडणूक निर्णय अधिकारी श्री. बी. डी. मोहिते वरील मार्केट कमेटीचे मतदान व मतमोजणी ज्या ठिकाणी घेण्यात येणार आहे. ते ठिकाण खालील प्रमाणे जाहीर करीत आहे.

| अ.क्र | मतदान केंद्र व नांव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | केंद्र क्र १ व केंद्र क्रं.२ कृषी पत संस्था व बहुउददेशीय पिक कर्ज देणा-या संस्था शेतकरी मतदार संघ | जि.प.प्राथमिक शाळा नं.१ दक्षिणाभिमुखी खोल्या २ |
| २ | केंद क्रं.३ व केंद्र क्रं.४ ग्रामपंचायत शेतकरी मतदार संघ | जि.प.प्राथमिक शाळा नं.२ पश्चिमाभिमुखी खोल्या २ |
| ३ | केंद्र क्रं.५ व केंद्र क्रं. ६ अडते व व्यापारी मतदार संघ | जि.प.प्राथमिक शाळा नं.१ पुर्वाभिमुखी खोल्या २ |
| ४ | केंद्र क्रं.७ हमाल व तोलाईदार मतदार संघ | जि.प.प्राथमिक शाळा नं.१ पुर्वाभिमुखी खोल्या १ |

वरील प्रमाणे दिनांक ३०/४/२०२३ रोजी सकाळी ८ ते दु.४ वाजेपर्यंत जि. प.प्राथमिक शाळा नं.१ च्या आवारातील वरील नमुद खोल्यामध्ये मतदान घेण्यात येणार असून मतदान संपलेनंतर लगेच मंजूर निवडणूक कार्यक्रमानुसार प्रशासकिय इमारत पहिला मजला आटपाडी येथील सभागृहात मतमोजणी होणार आहे. येणेप्रमाणे सर्व मतदारांनी व उमेदवारांनी नोंद घ्यावी. ठिकाण - आटपाडी

दिनांक-२५/४/२०२३

सही/- **बी. डी. मोहिते - निवडणुक निर्णय अधिकारी कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडी**